**MMRDA appoints PMC for Nariman Point--Colaba new bridge work**

**March 24th 2021**

**Mumbai:**

Considering significant traffic in South Mumbai, a new bridge connecting Nairman Point to Colaba has been proposed by the Mumbai Metropolitan Region Development Authority(MMRDA). This bridge will ensure reduced traffic congestion facilitating seamless travelling experience to motorists. For the said project, Poject Management Consultant (PMC) has been appointed said RA Rajeev, the Metropolitan Commissioner MMRDA.

Through the MMRDA various infrastructure projects have been undertaken, so to introduce new transportation connectivity for the citizens. Of which, for seamless and smooth commuting experience of residents staying in South Mumbai the authority has proposed new bridge linking Nariman point to Colaba.

Li Associates had submitted a traffic survey report in 2005-2008 to the MMRDA. In this report, development of bridge connecting Nariman Point to Colaba was recommended. At present, for travelling on this route only one single road-- Captain Prakash Pethe is available. Following which a lot of traffic congestion is reported on a daily basis here resulting in loss of time.

To overcome the existing traffic problem and enable smooth travelling experience MMRDA has planned the new bridge construction work connecting Nariman Point to Colaba. The bridge will be 1.6km. The appointed PMC will be responsible to prepare a detailed project report (DPR), suggest alignment, conduct traffic survey and study about necessary permissions that need to be obtained for carrying out the project. Besides, project estimated cost, and tendering process will be taken care of by PMC only. The expected job is required to be completed within four months of time period.

R A Rajeev, Metropolitan Commissioner MMRDA on the proposed project commented, "Nariman Point to Colaba new bridge will not effect the existing livelihood of fishermen and we will take care of it. All precautionary measures will be adopted. No obstruction will be caused to the fishermen boats due to the project work. Also, the PMC of the said project will conduct study of marine species. Nariman Point to Colaba new bridge once developed will reduce the travel time."

## नरिमन पॉईंट ते कुलाबा नवीन पुलासाठी सल्लागारची नेमणूक

### दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी एमएमआरडीएचा नवा प्रकल्प

**मुंबई, २४ मार्च २०२१:** वाहतुकीची वर्दळ असणाऱ्या दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी कमीं करून प्रवाशांच्या सुखद आणि जलद प्रवासासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नरिमन पॉईंट ते कुलाबा हा नवीन पुल उभारणी प्रकल्प हाती घेतला असून या प्रकल्पासाठी सल्लागारची नेमणूक करण्यात आल्याची माहिती आज श्री. आर. ए. राजीव, महानगर आयुक्त, एमएमआरडीए यांनी दिली.

मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकांना पायाभूत सुविधेसोबतच दळवळणाच्या उत्तम सुविधा प्राधिकरणामार्फत पुरविल्या जात आहेत. यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविले जात असून दक्षिण मुंबईतील नागरिकांच्या सुखद प्रवासासाठी प्राधिकरणाने नरिमन पॉईंट ते कुलाबा नवीन पुल प्रकल्पांचे काम हाती घेतले आहे.

प्राधिकरणाकडील सर्वंकष परिवहन अभ्यास सन २००५ - २००८ मध्ये लि.असोसिएट्स यांचेकडून करण्यात आला होता सदर अहवालामध्ये नरिमन ते कुलाबा ह्यांना जोडणारा मार्ग प्रस्तावित करण्यात आला होता. सध्यस्थितीत नरिमन पॉईंट येथून कुलाब्याला जाण्याकरीता कॅप्टन प्रकाश पेठे हा एकमेव मार्ग अस्तित्वात आहे. सदर मार्गिकेमध्ये प्रचंड वाहतूक कोंडी होत असून नागरिकांना वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. मार्गेकिवरील वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचा प्रचंड वेळ वाया जात आहे.

वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावून नागरिकांना सुखद आणि जलद प्रवासासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्यावतीने नरिमन पॉईंट ते कुलाबा हा नवीन पुल प्रकल्प बांधण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सदर पुलाची लांबी ही १.६ कि.मी असून या प्राधिकरणामार्फत या प्रकल्पासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. सदर सल्लागारामार्फत प्रकल्पाचे आरेखन, मार्गिका, विविध प्रकारचे वाहतूक सर्वेक्षण ,प्रकल्पाची अंदाजे रक्कम, अंलबजावणीची योजना तसेच आवश्यक सर्व परवानग्या आदी बाबत सखोल अभ्यास करण्यात येणार असून ४ महिन्यात काम पूर्ण करण्याचे उद्दिष्टे आहे.

सदर प्रकल्पाबाबत बोलताना श्री.आर.ए.राजीव, महानगर आयुक्त, एमएमआरडीए म्हणाले "नरिमन पॉईंट ते कुलाबा नवीन पूल प्रकल्पामुळे मच्छीमार बांधवांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नसून याची सर्वोतोपरी काळजी घेण्यात येईल तसेच त्यांच्या बोटी ये-जा करता कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेवूनच सदर पुलाची संरचना करण्यात येणार आहे. तसेच समुद्रातील जैविकतेचा अभ्यास देखील सदर सल्लागारकडून करण्यात येणार आहे. नरिमन पॉईंट ते कुलाबा नवीन पुलामुळे वाहतूक कोंडी कमी होवून प्रवाशांच्या वेळेत बचत होणार आहे. ”




**Proposed Nariman Point- Colaba Bridge**